शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

दि.२७ फेब्रुवारी,२०१७ हा दिवस **'मराठी भाषा गौरव दिन'** म्हणून उत्साहाने व गांभीर्यपूर्वक साजरा करण्याबाबतचे मा.विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दि.१७/०२/२०१७ रोजीचे पत्र व त्यासोबतच्या धारिका आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करून सदरबाबतचा अनुपालन अहवाल vinodtawdeminister@gmail.com या ई-पत्त्यावर तसेच संलग्नता टी-२ विभागाच्या ई-पत्त्यावर उलटटपाली पाठवावा.

कळावे,

आदेशान्वये,
I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/२११
दि.२२/०२/२०१७

मराठी भाषा गौरव दिन

मराठी भाषा गौरव दिन बोधचिन्ह (लोगो).JPG
211K

मराठी भाषा गौरव दिन

मराठी भाषा गौरव दिन बोधचिन्ह (लोगो वॉटस् ॲप).jpg
89K

मा मंत्री महोदय यांचे पत्र.pdf
456K

उपक्रमांची सूची.docx
17K

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक
कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : १७.०२.२०१७

सप्रेम नमस्कार !

आपल्याला मराठी भाषा गौरव दिनाच्या खूप शुभेच्छा ! कुसुमाग्रजांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी, आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो. या दिनाचे औचित्य साधून विविधांगी उपक्रम शासनाच्या वतीने योजले जातात. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी आपण **'संगणकावरील आणि महाजालावरील मराठी' या विषयाला प्राधान्य देण्याचे ठरविले आहे.**

आधुनिक काळात कोणतीही भाषा टिकवण्यासाठी आणि विस्तारण्यासाठी शिक्षणाचे माध्यम, बोली, प्रकाशित साहित्य, कोश, व्याकरण, सार्वजनिक वापर इत्यादी घटक भाषेसंदर्भात महत्त्वाचे आहेतच, त्याचबरोबर 'भाषेचा संगणकावर आणि महाजालावर (इंटरनेटवर) होणारा वापर', हा आजच्या युगात सर्वाधिक महत्त्वाचा घटक ठरतो आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील प्रत्येकाने महाजालावर मराठीचा वापर वाढविण्याचा आणि प्रत्येक संगणकावर युनिकोड-प्रणित मराठी कार्यान्वित करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात, समाजमाध्यमांवर (सोशल मीडियावर) ई-मेल, ब्लॉगलेखन, फेसबुक, ट्विटर, व्हॉटस् ॲप इत्यादी माध्यमांतून मराठीचा वापर वाढतो आहे. परंतु, या वापराचा वेग आणि व्याप्ती वाढणेही आवश्यक आहे.

विकिपीडिया हे जगभरातील असंख्य भाषांमध्ये कार्यरत असलेले लोकप्रिय संकेतस्थळ आहे. एखाद्या भाषेतील मजकुराची महाजालावरील पृष्ठसंख्या किंवा शब्दसंख्या हा भाषेच्या मोठेपणाचा आणि श्रेष्ठत्वाचा आजच्या काळातील निकष ठरतो आहे. हे लक्षात घेऊनच, **मराठी भाषा गौरव दिनी, महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी मराठी देवनागरी लिपीतील किमान १ परिच्छेद मजकूर 'मराठी विकिपीडियावर' टंकलिखित (टाईप) करावा, असे आग्रही आवाहन** मी करीत आहे. युनिकोडप्रणित मराठी संगणकावर कसे कार्यान्वित करावे व मराठी विकिपीडियावर मजकूर कसा लिहावा, याची कृती सोबत पाठवलीच आहे.

आमच्या आवाहनाला प्रतिसाद देत विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह, हजारो शाळा-महाविद्यालयांतील लाखो विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, सर्व शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी विकिपीडियावर लेखन करणार आहेत. आपणही या 'महाजालावरील मराठी लेखनाला' कृतिशील प्रतिसाद द्यावा, ही आग्रहाची विनंती. मी स्वत:ही विकिपीडियावर मजकूर लिहिणार आहे, तुमच्या प्रतिसादाची वाट पाहतो आहे.

**चला, विकिपीडियावर लिहू या! महाजालावर मराठी वाढवू या! युनिकोड-मराठी वापरू या! मराठीचा विकास साधू या!**

दि. २७ फेब्रुवारी या एकाच दिवशी केवळ प्रतिकात्मक कृती न करता, पुढील काळात आपण सर्व जण, संगणकावर आणि महाजालावर मराठीचा सातत्याने वापर कराल, या अपेक्षेसह आपणा सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या पुन्हा मन:पूर्वक शुभेच्छा!

सहपत्र : १. विकिपीडियावर लेखन करावयाची कृती.
२. युनिकोड कार्यान्वित करावयाचे टिपण.

आपला,

विनोद तावडे

(विनोद तावडे)

# दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ : मराठी भाषा दिन — उपक्रम सूची

१. मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

२. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

३. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

**४. युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.**

**५. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.**

६. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

७. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

८. मराठीतील कोश वाङ्:मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

९. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१०. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

११. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती — या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१२. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१३. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

१४.मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन

१५.मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्युच्च त्यागासह कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

१६. इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

---

टीप : आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल vinodtawdeminister@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमुद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

# विविध ऑपरेटींग सिस्टीम्समध्ये युनिकोडप्रणित मराठी कार्यरत करण्याची कृती

## (ऑपरेटिंग सिस्टिम )कार्यकारी प्रणाली - विंडोज 7

- Start >Settings > Control panel >Regional and Language options या पर्यायावर जा.
- Region and Language options मध्ये Keyboards and Language मधील Change Keyboard ह्या खुणेवर क्लिक करा.
- Text services and Input Languages नावाच्या चौकटीतल्या Add ह्या खुणेवर क्लिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल. त्यातील Input Language मधील भाषांच्या सूचीतून Marathi निवडा, OK या खुणेवर क्लिक करा.
- आता Text services and Input Language च्या तळाशी असलेल्या Apply आणि OK या बटणांवर क्रमाने क्लिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल.
- MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.
- लक्षात ठेवा Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

## कार्यकारी प्रणाली - विंडोज 8, 10

- Start > Control panel >All control>Panel Item> Language
- Add a Language खूण असलेली लहान चौकटीवर क्लिक करा. त्यातील भाषांच्या सूचीतून Marathi वर जाऊन Add या खुणेवर क्लिक करा.
- यानंतर कळफलक मराठी होईल. Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.
- इन्स्क्रिप्टव्यतिरिक्त इतर कळफलक वापरण्यासाठीची कृती सोबत दिली आहे.

## कार्यकारी प्रणाली - विंडोज एक्सपी

- विशेष टीप- विंडोज् **XP** मध्ये युनिकोड क्रियाशील करण्यासाठी **XP** ची **Installation CD** लागते.
- XP Professional साठी -Start > Control panel>Region and Language options

- XP Home Edition साठी- Start> Control panel> Date, Time, Language and Regional Option > Region and Language options
- नंतर Languages यावर क्लिक करा
- Regional Options या चौकटीत Standards and formats ही चौकट बरचेदा छोट्या चौकटीत English (United States) असे लिहलेले दिसते.
- चौकटीतील Supplemental language support या भागातील Install files for complex scripts and right-to-left languages (including Thai) हा पर्याय निवडा. Apply आणि OK वर टिक करा. यानंतर Install Supplemental Language Support या वर OK करा
- Files needed असे शब्द असलेली चौकट दिसेल. संगणकाकडून विंडोज् XP च्या i386 या फोल्डरसाठी Installation CD ची मागणी होईल. ती सीडी टाका
- Regional and Language Options...Copying Files अशी प्रक्रिया सुरु होईल.
- यानंतर संगणक पुनर्स्थित / रिस्टार्ट करावा.
- Start > Control panel > Regional and Language options चौकट उघडले . त्यातील व Languages या खुणेवर टिक करा.
- दुसरी चौकट उघडले . त्यात Details या खुणेवर टिक करा.
- Text services and input languages नावाची नवी चौकट उघडेल.
- या चौकटीत Add या खुणेवर टिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल.
- यातील Input language खालील भाषांच्या यादीतून Marathi निवडा.
- OK या खुणेवर टिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल. MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.
- Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

मराठी टंकलेखनासाठी कळफलकांचे विविध पर्याय -

- संगणकावर कोणत्याही ऑपरेटिंग सिस्टिममध्ये युनिकोडप्रणित मराठी टाईप करण्यासाठी कळफलकाचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.
- इनस्क्रिप्ट (भारतलिपी) हा भारतीय मानक ब्युरोने प्रमाणित केलेला कळफलक आहे. भाषातज्ज्ञ आणि संगणकतज्ज्ञ इनस्क्रिप्ट (भारतलिपी) वापरावा, असा आग्रह धरतात. शास्त्रीयदृष्ट्या योग्य असलेला हा कळफलक आपण सर्वांनी वापरणे अपेक्षित आहे.
- मराठी टंकलेखनासाठी इनस्क्रिप्टशिवाय कळफलकांचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. गुगल इनपुट या साधनाच्या माध्यमातून, तुम्ही फोनेटिक पद्धतीचा कळफलक वापरु शकता.
- तसेच http://raigad.nic.in/ व http://www.bhashaindia.com अशा संकेतस्थळांवरही कळफलकांचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

## इन्स्क्रिप्ट व इतर कळफलक उतरवण्यासाठी -

- http://www.bhashaindia.com या संकेतस्थळावरील Marathi_IME_setup.zip ही कळफलकांचे विविध पर्याय देणारी धारिका आपल्या संगणकावर उतरवून घ्या. ती संगणकावर संग्रहित (Save) करा.
- त्यातील Setup.exe ही धारिका दोनदा क्लिक करून कार्यरत करून घ्या.
- Marathi IME- कळफलक कार्यरत करण्यासाठी पुढील एकेका खुणेवर बाण नेऊन क्रमाने क्लिक करा - Start > Settings> Control panel > Regional and Language options > Details > Add
- Add Input Language अशी खूण असलेली एक चौकट उघडेल. त्यात Keyboard layout/ IME ह्या चौकटीत क्लिक करा.
- त्यातील सूचीतून Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय निवडा व OK म्हणा. आता IME 1 [V 6.0] ही उपलब्ध झाला आहे.
- Text Services and input languages - ह्या आधीच्या चौकटीतील Installed services या लहान चौकटीत पाहा. MA Marathi खाली Keyboard मध्ये Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून Apply व OK म्हणा.
- तळपट्टीच्या उजवीकडे पाच चौकोनांची पट्टी दिसेल. त्यातील दुसऱ्या चौकोनात क्लिक केल्यावर अनेक कळफलकांची नावे दिसतील.
- इन्स्क्रिप्ट हा कळफलकच वापरावा, असे संगणक व भाषा क्षेत्रातील तज्ज्ञ सुचवितात. कळफलकांचे अन्य पर्यायही या कृतीमुळे उपलब्ध होतात.

# विविध ऑपरेटींग सिस्टीम्समध्ये युनिकोडप्रणित मराठी कार्यरत करण्याची कृती

## (ऑपरेटिंग सिस्टिम )कार्यकारी प्रणाली - विंडोज ७

- Start >Settings > Control panel >Regional and Language options या पर्यायावर जा.
- Region and Language options मध्ये Keyboards and Language मधील Change Keyboard ह्या खुणेवर क्लिक करा.
- Text services and Input Languages नावाच्या चौकटीतल्या Add ह्या खुणेवर क्लिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल. त्यातील Input Language मधील भाषांच्यां सूचीतून Marathi निवडा, OK या खुणेवर क्लिक करा.
- आता Text services and Input Language च्या तळाशी असलेल्या Apply आणि OK या बटणांवर क्रमाने क्लिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल.
- MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.
- लक्षात ठेवा Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

## कार्यकारी प्रणाली - विंडोज ८, १०

- Start > Control panel >All control>Panel Item> Language
- Add a Language खूण असलेली लहान चौकटीवर क्लिक करा. त्यातील भाषांच्या सूचीतून Marathi वर जाऊन Add या खुणेवर क्लिक करा.
- यानंतर कळफलक मराठी होईल. Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.
- इन्स्क्रिप्टव्यतिरिक्त इतर कळफलक वापरण्यासाठीची कृती सोबत दिली आहे.

# कार्यकारी प्रणाली – विंडोज एक्सपी

- विशेष टीप- विंडोज् XP मध्ये युनिकोड क्रियाशील करण्यासाठी XP ची **Installation CD** लागते.
- XP Professional साठी -Start > Control panel>Region and Language options
- XP Home Edition साठी- Start> Control panel> Date, Time, Language and Regional Option > Region and Language options
- नंतर Languages यावर क्लिक करा
- Regional Options या चौकटीत Standards and formats ही चौकट बरचेदा छोट्या चौकटीत English (United States) असे लिहलेले दिसते.
- चौकटीतील Supplemental language support या भागातील Install files for complex scripts and right-to-left languages (including Thai) हा पर्याय निवडा. Apply आणि OK वर टिक करा. यानंतर Install Supplemental Language Support या वर OK करा
- Files needed असे शब्द असलेली चौकट दिसेल. संगणकाकडून विंडोज् XP च्या i386 या फोल्डरसाठी Installation CD ची मागणी होईल. ती सीडी टाका
- Regional and Language Options...Copying Files अशी प्रक्रिया सुरु होईल.
- यानंतर संगणक पुनर्स्थित / रिस्टार्ट करावा.
- Start > Control panel > Regional and Language options चौकट उघडले . त्यातील व Languages या खुणेवर टिक करा.
- दुसरी चौकट उघडले . त्यात Details या खुणेवर टिक करा.
- Text services and input languages नावाची नवी चौकट उघडेल.
- या चौकटीत Add या खुणेवर टिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल.
- यातील Input language खालील भाषांच्या यादीतून Marathi निवडा.
- OK या खुणेवर टिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल. MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.
- Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

मराठी टंकलेखनासाठी कळफलकांचे विविध पर्याय -

- संगणकावर कोणत्याही ऑपरेटिंग सिस्टिममध्ये युनिकोडप्रणित मराठी टाईप करण्यासाठी कळफलकाचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.
- इनस्क्रिप्ट (भारतलिपी) हा भारतीय मानक ब्युरोने प्रमाणित केलेला कळफलक आहे. भाषातज्ज्ञ आणि संगणकतज्ज्ञ इनस्क्रिप्ट (भारतलिपी) वापरावा, असा आग्रह धरतात. शास्त्रीयदृष्ट्या योग्य असलेला हा कळफलक आपण सर्वांनी वापरणे अपेक्षित आहे.
- मराठी टंकलेखनासाठी इनस्क्रिप्टशिवाय कळफलकांचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. गुगल इनपुट या साधनाच्या माध्यमातून, तुम्ही फोनेटिक पद्धतीचा कळफलक वापरु शकता.
- तसेच http://raigad.nic.in/ व http://www.bhashaindia.com अशा संकेतस्थळांवरही कळफलकांचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

## इन्स्क्रिप्ट व इतर कळफलक उतरवण्यासाठी -

- http://www.bhashaindia.com या संकेतस्थळावरील Marathi_IME_setup.zip ही कळफलकांचे विविध पर्याय देणारी धारिका आपल्या संगणकावर उतरवून घ्या. ती संगणकावर संग्रहित (Save) करा.
- त्यातील Setup.exe ही धारिका दोनदा क्लिक करून कार्यरत करून घ्या.
- Marathi IME- कळफलक कार्यरत करण्यासाठी पुढील एकेका खुणेवर बाण नेऊन क्रमाने क्लिक करा - Start > Settings> Control panel > Regional and Language options > Details > Add
- Add Input Language अशी खूण असलेली एक चौकट उघडेल. त्यात Keyboard layout/ IME ह्या चौकटीत क्लिक करा.
- त्यातील सूचीतून Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय निवडा व OK म्हणा. आता IME 1 [V 6.0] ही उपलब्ध झाला आहे.
- Text Services and input languages - ह्या आधीच्या चौकटीतील Installed services या लहान चौकटीत पाहा. MA Marathi खाली Keyboard मध्ये Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून Apply व OK म्हणा.
- तळपट्टीच्या उजवीकडे पाच चौकोनांची पट्टी दिसेल. त्यातील दुसऱ्या चौकोनात क्लिक केल्यावर अनेक कळफलकांची नावे दिसतील.
- इन्स्क्रिप्ट हा कळफलकच वापरावा, असे संगणक व भाषा क्षेत्रातील तज्ज्ञ सुचवितात. कळफलकांचे अन्य पर्यायही या कृतीमुळे उपलब्ध होतात.

# विकिपीडियावरील लेखन - कृती

सर्वप्रथम आपण मराठी विकिपीडियावर (http://mr.wikipedia.org/wiki/ ) आपल्या नावाची "नवीन नोंदणी" (Sign In) अवश्य करावी. आपल्याला लेख संपादन करण्यासाठी त्याची मदत होईल. त्यासाठी पानाच्या वरील उजव्या कोपऱ्यात "नवीन नोंदणी किंवा प्रवेश करा" येथे क्लिक करून नवीन नोंदणी करावी. त्यानंतर आपल्या खात्यात प्रवेश करून संपादनास सुरुवात करावी.

**विकिपीडियावर नवीन लेख कसा लिहावा ( संपादन )**

नजीकच्या काळापासून विकिपीडियावर नवीन संपादन पद्धती उपलब्ध केली आहे . विकि-मार्कअप विषयी माहिती नसतानाही कुणीही सर्वसामान्य व्यक्ती सुलभतेने संपादन करू शकेल असा या सुविधेचा उद्देश आहे.

१ ज्या विषयावर आपल्याला लेख लिहावयाचा आहे त्याचे नाव सुरूवातीला मुखपृष्ठावरील शोधखिडकीत टाकून त्यापुढे असलेल्या शोधभिंगावर टिचकी मारा. समजा तुम्हाला कुशावर्त या विषयावर लेख निर्माण करावयाचा आहे तर पुढीलप्रमाणे कृती करा.

२ शोध घेतल्यानंतर त्या विषयावर विकिपीडियात लेख उपलब्ध नसल्यास सुरुवातीच्या ओळीत मराठी विकिपीडियावर "कुशावर्त हा लेख लिहा" असे आपणास दिसेल. हा लेख उपलब्ध नसल्यास कुशावर्त हा शब्द तुम्हाला लाल रंगात दिसेल. त्या लाल रंगात दिसणाऱ्या शब्दावर टिचकी मारावी.

३ आता आपल्याला कुशावर्तची निर्मिती सुरू आहे, असा संदेश दिसेल व त्याखाली असलेल्या संपादन खिडकीत तुम्हाला लेखात टाकावयाचा मजकूर लिहिता येईल.

४ संपादन खिडकीत मजकूर लिहून झाल्यावर वरती उजव्या हाताला जतन करा बटनावर टिचकी मारा आणि लेख विकिपीडियावर प्रदर्शित करा.

(कुशावर्त हा विषय उदाहरण म्हणून दिला आहे. आपणास योग्य वाटेल त्या विषयावर लेखन करु शकता. )